**प्रेसनोट** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर

दि.३०/०६/२०२६

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक /अहिल्यानगर. |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे |
| आरोपीचे लोकसेवक नाव, वय व कार्यालय | १) हैदर याकुब पटेल,वय—५६ वर्षे,व्यवसाय—नोकरी,ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत सात्रळ,ता.राहुरी,जि.अहिल्यानगर,रा.वृंदावन कॉलनी, श्रीरामपुर रोड,राहुरी फॅक्टरी,ता.राहुरी,जि.अहिल्यानगर.<br>२) ज्ञानदेव मोहन डुकरे,वय—४३ वर्षे, व्यवसाय—नोकरी, लिपिक(कंत्राटि), ग्रामपंचायत सात्रळ,ता.राहुरी,जि.अहिल्यानगर,रा.सात्रळ,ता. राहुरी,जि.अहिल्यानगर.<br>३) सचिन हौशीराम ब्राम्हणे,गृहनिर्माण अभियंता,(कंत्राटि),पंचायत समिती,राहुरी,ता.राहुरी,जि.अहिल्यानगर,रा.समता नगर,वेताळ बाबा चौक,लोणी,ता.राहाता,जि.अहिल्यानगर. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रूपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/— रूपये |

**थोडक्यात हकिकत:—**

हकिकत अशी कि,यातील तक्रारदार यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळणेकामी अर्ज केला होता व सन २०२३ मध्ये तक्रारदार यांना घरकुल मंजुर झाले होते.घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा पहिला हप्ता १५,०००/— रूपये व दुसरा हप्ता ७०,०००/— रूपये तक्रारदार यांना प्राप्त झाले होते.तक्रारदार यांना घरकुलाचे बांधकाम करण्याकरीता अनुदानाचा हप्ता ७०,०००/— रू.मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात व घरकुलाचे बांधकामाकरीता मिळणा—या अनुदानाचे पुढील हप्ता मंजुर करण्याच्या प्रक्रियेत मदत करण्याकरीता आरोपी लोकसेवक क्र.२ डुकरे हे लोकसेवक क्र.१ पटेल व लोकसेवक क्र.३ ब्राम्हणे यांचेकरीता २०,०००/— रूपये लाचेची मागणी करत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे दिनांक २९/०६/२०२६ रोजी प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक ३०/०६/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी वेळी तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक क्र. १ पटेल व आरोपी लोकसेवक क्र.२ डुकरे यांची भेट घेतली असता आरोपी लोकसेवक क्र. १ पटेल व आरोपी लोकसेवक क्र.२ डुकरे यांनी तक्रारदार यांचेकडे .घरकुल बांधकामाकरीता अनुदानाचा हप्ता ७०,०००/— रू.मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात व घरकुलाचे बांधकामाकरीता मिळणा—या अनुदानाचे पुढील हप्ते मंजुर करण्याच्या प्रक्रियेमध्ये मदत करण्याकरीता २०,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.

दिनांक ३०/०६/२०२६ रोजी आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक क्र.२ डुकरे यांनी सदर लाच रक्कम २०,०००/— रूपये तक्रारदार यांचेकडुन स्विकारली आहे व आरोपी लोकसेवक क्र.३ बाम्हणे यांनी आरोपी लोकसेवक क्र.२ डुकरे यांना तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहन दिले आहे.

**१) सापळा अधिकारी:—** पोलीस निरीक्षक,श्रीमती सविता तांबे,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर

**२) पर्यवेक्षण अधिकारी:—** पोलीस उप अधिक्षक श्री.अजित त्रिपुटे,मो.नं. ८३२९७०१३४४

**३) सापळा पथक:—** १) पोलीस निरीक्षक,राजु आल्हाट, २) पोना/७०९ चंद्रकांत भिमसेन काळे ३) पोकॉ/२५७९ किशोर विठठल कुळधर ४) पोकॉ/२२६२ शेखर बाळासाहेब वाघ ५) चालक पोहेकॉ/दशरथ भिमराव लाड सर्व नेम— ला.प्र.वि.अहिल्यानगर

**४) तपासी अधिकारी:—** पोलीस निरीक्षक श्रीमती छाया देवरे मो.नं.८७८८२१५०८६

मार्गदर्शन

**१) मा.श्री.भारत तांगडे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक**

२) मा. श्री.प्रदिप मैराळे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

३) मा.श्रीमती कविता फडतरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अहवान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाचमागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता:— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, टि.व्ही सेंटर समोर, सावेडी, अहिल्यानगर.

**संकेत स्थळः**– acb.maharashtra.gov.in
**ई मेलः**– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacba.nagar @ gmail.com
**ऑनलाईन तक्रारः**– :– acbmaharashtra.net **दुरध्वनी क्रः**– 0241–02423677

**संपर्क क्रमांकः**–

**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर–टोल फ्री क्रः**– 1064 **व्हॉटस अप क्रमांकः**– ९११६८६४११०६४
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक – **टोल फ्री क्रः**– 1064 वॉट्स अप क्रमांक ९५४५६५१०६४
लाचलुचपत प्रतिंबंधक विभाग,जळगाव – **टोल फ्री क्रः**– 1064 वॉट्स अप क्रमांक ७५८८६६१०६४
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे – **टोल फ्री क्रः**– 1064 वॉट्स अप क्रमांक ७७९८१६१०६४
लाचलुचपत प्रतिबंध विभाग,नंदुरबार – **टोल फ्री क्रः**– 1064 वॉट्स अप क्रमांक ९४२३५४१०६४

( अजित त्रिपुटे )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर.